॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
**परीक्षा विज्ञान विभाग**

जा.क्र.कबचौउमवि/७- ड /  विज्ञान/२०२ /२०२५ दिनांकः-२४/०१/२०२५

**सुधारित परिपत्रक**

प्रती,

**मा.प्राचार्य/मा.संचालक/मा.विभागप्रमुख,**
कबचौउमविशी संलग्नीत सर्व कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालये,मान्यताप्राप्त परिसंस्था व कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा.

**विषय - हिवाळी (Winter)-२०२४ मध्ये घेण्यात येणा-या व्यवस्थापनशास्त्रे विद्याशाखेतील शैक्षणिक वर्ष - २०२४-२५ मधील प्रथम वर्ष सत्र-१ As per NEP-२०२० AY-२०२४ च्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा आयोजित करणेबाबत..**

महोदय,

वरील विषयासंदर्भात आपणास कळविण्यात येते कि, **हिवाळी (Winter)-२०२४** मध्ये होणा-या **शैक्षणिक वर्ष-२०२४-२५मधील प्रथम वर्ष सत्र-१ As per NEP-२०२०,AY-२०२४-२५ नियमीत प्रवेशित F.Y.B.C.A.** या अभ्यासक्रमाच्या **सत्र-१ As per NEP-२०२० AY-२०२४-२५ नियमीत प्रवेशित अभ्यासक्रमाच्या** ज्या ज्या विषयांना **३० गुणांची** प्रात्यक्षिक परीक्षा आहे. अशा विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा संबंधित महाविद्यालयाच्या मा.प्राचार्यांनी/संचालकांनी व मा. विभागप्रमुखांनी विद्यापीठाच्या वतीने **संबंधित वर्गाच्या प्रात्यक्षिक परीक्षा हया लेखी परीक्षांच्या एक आठवडा अगोदर वा लेखी परीक्षांच्या नंतर एक आठवडा या दरम्यान आपल्या सोयीनुसार आपल्या स्तरावर आयोजित कराव्यात.**

वरील वर्गाच्या **प्रात्यक्षिक परीक्षेसाठी** मा. प्राचार्य /संचालक व मा. विभागप्रमुख यांनी बहिस्थ परीक्षक (विषयतज्ज्ञ) म्हणून जवळच्या महाविद्यालयातील व अंतर्गत परीक्षक म्हणून आपल्या महाविद्यालयातील मान्यता प्राप्त शिक्षकाची नियुक्ती करुन प्रात्यक्षिक/मौखिक परीक्षा आयोजित करावी. **तसेच संबंधित परिक्षकास परीक्षा गैरप्रकाराबाबत शिक्षा झालेली नसावी,** सदरची नियुक्ती शक्यतोवर आपल्या नजिकच्या महाविद्यालयातील/परिसंस्थेतील संबंधित विषय शिक्षकांची करावी व हया संबंधात काही अडचण असल्यास मा.अधिष्ठाता, विज्ञान विद्याशाखा यांचेशी संपर्क साधावा.

उपरोक्त प्रमाणे प्रात्यक्षिक/मौखिक परीक्षेचे आयोजन करून सदर परीक्षेचे गुण विद्यापीठाच्या **प्रात्यक्षिक परीक्षा संपल्यानंतर लगेचच** ई-सुविधा केंद्राच्या **ADES Software** व्दारे **Online** रित्या सादर करण्यात यावेत व त्याच्या **मुळ गुणयादया परीक्षा झाल्यानंतर एक आठवडयाच्या आंत विद्यापीठात जमा कराव्यात.**

ज्या अभ्यासक्रमांना बैठक क्रमांक प्राप्त झालेले नसतील, अशा विद्यार्थ्यांचे गुण परिशिष्ठ-१ व्दारे वरील मुदतीत विद्यापीठात सादर करावेत.

वरील परीक्षेचे **Online गुण विहीत मुदतीत प्राप्त न झाल्यास, विद्यापीठाच्या पत्र क्र. कबचौउमवि/७अ/अंतर्गत-प्रात्यक्षिक गुणयाद्या/३८०/२०१९,दिनांक ४ फेब्रुवारी २०१९ नुसार दंडात्मक कार्यवाही केली जाईल.** तसेच सदरच्या पत्रात नमूद केलेल्या मुदतीनंतर प्राप्त झालेले गुण स्विकारले जाणार नाहीत व या प्रकरणी विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस संबंधीत महाविद्यालय/परिसंस्था जबाबदार राहील.

तरी वरीलप्रमाणे प्रात्यक्षिक परीक्षा आयोजित करुन व विहीत मुदतीत गुणयाद्या पाठवून विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

म.कळावे,

**आपला विश्वासू**
**Sd /-**
**(प्रा.योगेश.एन.पाटील)**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**
**कबचौ उमवि,जळगाव**

**प्रत: माहिती व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी-**

**१)मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,कबचौ उमवि,जळगाव यांचे कार्यालय**
**२)मा. अधिष्ठाता, विज्ञान विद्याशाखा,कबचौ उमवि,जळगाव यांचे कार्यालय**
**३)संगणक केंद्र प्रमुख/ ई-सुविधा केंद्र,कबचौ उमवि,जळगाव यांचे कार्यालय**